**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1751/2007.**

गं. भां. हिराबाई नामदेवजी ठेंगरी
मु. पा. ता. साकोली (पंचशिल वार्ड)
जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
ठाणेदार साहेब
पोलीस स्टेशन साकोली
ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. दि. 17.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.4.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी म्हणून ठाणेदार पोलीस स्टेशन साकोली यांचेकडे दि. 10.4.2007 रोजी नोंदविलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीबाबत तपशिल लेखी स्वरुपात टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन

मागितलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून ठाणेदार पोलीस स्टेशन साकोली यांचेकडेच प्रथम अपील परत दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये पोलीस निरीक्षक स्टेशन साकोली यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला.

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने सविनय सादर की यातील अपीलकर्ता अर्जदार गं. भां. हिराबाई नामदेवजी ठेंगरी (पंचशिल वार्ड) साकोली हिने दि. 20.4.07 ला ठाणेदार साकोली यांचे नावे दिलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये माहिती मागितली होती. परंतू माहितीचा अधिकार जन माहिती अधिकारी हे उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली हे आहेत. परंतू सदरचा अर्ज पो.हवा.पवनकर ब. नं. 645 यांचेकडे अर्ज रजि. क्र. 115 दि. 14.7.07 रोजी देण्यात आल्याचे रजिस्टर मध्ये नोंद आहे. रजिस्टर मध्ये माहिती दिल्याबद्यल किंवा अर्ज मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली यांचेकडे माहिती देण्यास रवाना केल्याची रजिस्टर नोंद नाही व अर्जदारास सुचना दिल्याबाबतची नोंद नाही.

तरीपण अर्जदार बाई हिने पो.स्टे.ला दिलेल्या रिपोर्टवर गैरअर्जदाराविरुध्द इस्तेगासा क्र. 132/07 कलम 107 116(3) जा.फौ. अन्वये दि. 19.4.07 ला प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली असुन मा. तहसिलदार साकोली यांचे कोर्टात न्यायप्रविष्ट आहे.

तसेच दि. 24.9.07 रोजी अर्जदार बाई हिने दिलेलया तक्रारीवर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात येवु नये असा लेखी अर्ज व बयान पेश केलेला आहे. तरी सदरचा अर्ज सेवेशी सादर आहे. व खुलाशा सोबत 13 कागदपत्रे दाखल केलेत ती खालीलप्रमाणे.

1. मुळ अर्ज 1, दोन प्रत
2. जोड पत्र 'क' 1
3. जोडपत्र 'अ' 1
4. स्टे. डा. ओ सी 1
5. इसेगासा ओ सी 1
6. तोंडी रिपोर्ट ओ सी 1
7. समन्स कलम 149 जा. फौ. नोटीस 1
8. बयान हिराबाई 2
9. बयान आम्रपाली 2
10. स्ट. डा. सान्हा ओ सी 1
11. ठरावाची कागदपत्रे ओ सी 1
12. अर्ज 1 हिराबाई
13. बयान 1

सदरच्या खुलाशात नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अर्ज हा जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे केलेला नाही तसेच प्रथम अपील सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडे केलेला नसल्यामुळेच दोन्ही अर्जाचे व संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र तक्रारी संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांचे बयाण घेतलेले दिसून येते. व त्यानंतर सर्वात शेवटी अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2007 रोजी ''माझे प्लॉटची जागा ही बरोबर असल्याने मी दिलेल्या रिपोर्टवर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात येवू नये. करीता मी स्वतः पोलीस स्टेशन साकोली येथे अर्ज आणुन पेश केला आहे'' असा अर्ज दिला आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे बयाण सुध्दा घेतलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांचे दि. 10.4.2007 चे तक्रारी वर पुर्ण कारवाई पोलीस यांचेकडे झालेली

दिसून येते. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा ठाणेदार यांनी न्यायालयात जावून दाद मागावी असा सल्ला दिला होता असेच म्हटले आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्या न्यायालयात जावू शकत नाही. परंतु कोणत्याही जमिनिच्या संदर्भामध्ये मालकी हक्काचा वाद, अतिक्रमण किंवा जबरी ताबा घेणे करीता वाद असेल त्याकरीता न्यायालयात निर्णय मिळु शकतो. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे उपलब्ध असलेली कागदपत्राची छायांकीत प्रती मिळतात. त्यामुळे द्वितीय अपीलातील ''सुरु असलेल्या बांधकाम मला झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई व माझ्यावर होणारा अन्याय थांबवून मला न्याय मिळवून द्यावा'' ही विनंती राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेर असल्यामुळे मान्य करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील मेमोमध्ये कारवाईची विनंती ही मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 14.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.